JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शिवकालीन स्वराज्यातील प्रशासन : संकल्पना आणि वैशिष्ट्ये

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.

**प्रस्तावना -**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक कुशल प्रशासक म्हणून शिवाजी महाराज सर्वपरिचित आहे. एखादा प्रदेश हस्तगत केल्यावर तेथे प्रशासन व्यवस्था सुव्यवस्थित लावून आपल्या राजवटीची वैशिष्ट्ये ते दाखवून देत असत. राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी कार्यक्षम प्रशासकांची गरज असते या विचाराने प्रशासनात नेमणूका करताना गुण व निष्ठा हाच प्रमुख निकष स्वराज्यात लावला जात होता. आपल्या अंतसमयी रामचंद्रपंत अमात्य स्वराज्याचा विस्तार सांगताना शिवाजी महाराज म्हणतात, "राज्य म्या शिवाजीने चाळीस हजार होनाचा पुणे महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचे राज्य पैदा केले". स्वराज्यामध्ये समाविष्ट असलेल्या सुभ्यांच्या उत्पन्नाची माहिती देणारा एक शिवकालीन जाबता (अधिकारपत्र, परवाना) उपलब्ध आहे. त्यामध्ये स्वराज्यातील सुभ्यांचे एकूण उत्पन्न 1,32,66,635 एवढे आहे. स्वराज्यात समाविष्ट प्रदेश हा एकूण 14 सुभ्यांचा होता. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची भौगोलिक मर्यादा स्पष्ट करताना रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रात म्हटले आहे की, "सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादन केले". साधारणपणे शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या भौगोलिक सीमा पुढीलप्रमाणे सांगता येतील. उत्तरेकडे बागलाण प्रदेश, दक्षिणेकडे नाशिक व पुणे भागातून सातारा आणि कोल्हापूर भागापर्यंत स्वराज्याची सरहद्द होती. ही सरहद्द सरळ रेषेत थेट कारवारपर्यंत येऊन भिडली होती. त्याशिवाय कर्नाटकातील बेळगाव, कोप्पल, बल्लारी, चित्तुर, अर्कॉट, बेलोर आणि जिजी या भागातील काही प्रदेश स्वराज्यामध्ये मोडत होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची प्रशासन व्यवस्था अत्यंत काटेकोर पद्धतीने केलेली होती. राजा हा सर्वश्रेष्ठ असून मुलकी, लष्करी तसेच न्यायविषयक प्रशासनाचे अधिकार राजाच्या हाती केंद्रीत झाले होते. हिंदवी स्वराज्याचा राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती.

शिवकालीन स्वराज्याच्या केंद्रस्थानी सामान्य मनुष्य आणि त्याचे हित होते. राज्यकारभारतील अतिशय महत्त्वपूर्ण घटक म्हणून प्रशासनाकडे पाहले जाते. प्रशासनामुळे राज्याची संकल्पना, प्रतिमा सर्वसामान्यात निर्माण होते. लोकमनावर प्रशासन, प्रशासकीय यंत्रणेच्या एवढा गाढा प्रभाव पडतो की, त्याच्या खाणाखुणा या प्रत्यक्ष लोकसंस्कृतीमध्ये रेखाटल्या जातात. संस्कृतीचे हे कोंदण बखरी, पत्रे, आठवणी व प्रवासवर्णने इत्यादींच्या रूपाने इतिहासामध्ये नोंदविले जाते. इतिहासातील या नोंदीवरून शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची संकल्पना आणि वैशिष्ट्ये समजून घेणे हा सदर शोधनिबंधाचा उद्देश्य आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्ट्ये -**

1. शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची संकल्पना अभ्यासणे.
2. शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची वैशिष्ट्ये समजून घेणे.
3. शिवकालीन प्रशासनाची व्यूहरचना स्पष्ट करणे.
4. शिवकालीन लोकप्रशासनाचे प्रमुख केंद्रस्थान जाणून घेणे.
5. ज्या ज्या घटकामुळे स्वराज्यामध्ये कल्याणकारी प्रशासन निर्माण झाले ते अभ्यासणे.

**शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची संकल्पना -**

शिवाजी महाराज हे स्वराज्याच्या प्रशासनाचे प्रमुख होते. शिवाजी महाराजांची शासन व्यवस्था प्रचलित इस्लामी शासन संस्था, भारतीय नीतिशास्त्र, स्मृतीग्रंथ, धर्मग्रंथ यावर आधारलेली होते. मुघल व आदिलशाहीपेक्षा आपले प्रशासन अधिक लोकाभिमुख असावे, असा शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन होता. त्याचे चित्र तत्कालीन बखरींतून उमटले आहे. शिवाजी महाराजांचे प्रशासन कौटिल्याच्या सप्तांग सिध्दांतावर आधारले होते. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात राज्याचे सात अंग स्पष्ट केलेले आहे. शिवाजी महाराजांनी या सातही अंगांचा कसा शास्त्रीय विकास केला हे सांगताना डॉ. अ.रा. कुलकर्णी म्हणतात, "राज्यशासनाची प्रमुख सात अंगे होती. राजा, मंत्री, सुहद अथवा मित्र, कोश म्हणजे खजिना, राष्ट्र, दुर्ग म्हणजे गड, कोट, जंजिरे, सैन्य म्हणजे हुजुरात, लष्कर, आरमार इत्यादी. यापैकी एकही अंग विकल झाल्यास राज्य विनाश पावे. यावरुन शिवाजी महाराजांनी प्राचीन भारतीय दंडनीतिशास्त्राचा व राजकीय अर्थशास्त्राचा अभ्यास करुन आपल्या प्रशासनाची बैठक लावली होती असे म्हणता येईल. डॉ. अ.रा. कुलकर्णी तत्कालीन प्रशासनाची संकल्पना स्पष्ट करताना म्हणतात, "स्वराज्यामध्ये अभिवृध्दीबरोबरच त्या त्या प्रदेशाची शासकीय व्यवस्था लावलेली होती. यामुळे स्वराज्य विस्ताराबरोबरच शासकीय यंत्रणाही वाढत गेली". डॉ. अ.रा. कुलकर्णी शिवकालीन सामाजिक प्रशासनाची बैठक स्पष्ट करताना लिहितात की, "राजकीय प्रशासन संस्थेच्या बरोबरच स्थानिक लोकरुढ देशक अथवा गोतादी शासन संस्था आणि वर्णाधिष्ठित जाती अथवा सामाजिक संस्था आपापल्या क्षेत्रात कार्य करीत होत्या".

सुरत लुटल्यानंतर बादशहास शिवाजी महाराजांनी जे पत्र लिहिले त्या पत्राबददल 91 कलमी बखरीमध्ये म्हटले आहे. "पातशाही पुरातन हिंदूंची आहे. दक्षण तख्ते दौलताबाद निजामशहा पातशाहाचे आम्ही वजीर कदीम निजामशाहा पातशाही तुमचे दक्षणेस काही नाही. पातशाही दिल्लीची तुमची नव्हे, पुरातन हिंदूंची" यावरुन शिवाजी महाराजांचा प्रशासकीय दृष्टिकोन हिंदू जीवन शैलीवर आधारलेला होता याची प्रचिती येते. रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात असे म्हटले आहे की, "राज्य मूळ नृप, ईश्वर सर्व जगाचा गुरू, सकळांचे कल्याण, अकल्याणाचा हिंदू नृपती कल्पिक आहे. तो सगुण असला तर बहुतांचे कल्याण" अशा प्रकारे हिंदू परंपरांचे पालन आणि संवर्धन हा शिवकालीन प्रशासनाचा एक धागा होता.

शिवकालीन प्रशासन हे प्रभावी अशा गुप्तहेर पध्दतीवर आधारलेले होते. बहिर्जी नाईक हे शिवाजी महाराजांच्या हेरखात्याचे प्रमुख होते. सभासदाने सुरत लुटीची कथा लिहिताना म्हटले आहे, "सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला की, सुरत मारिल्याने अगणित द्रव्य सापडले". यावरुन आपणास शिवकालीन गुप्तहेर किती तरबेज होते आणि शिवाजी महाराजांना ते योग्य माहिती कशी पुरवीत होते याची कल्पना येते. हेरवाडकर यांच्या मते, "बहिर्जी नाईक हा शिवाजी महाराजांचा मुख्य हेर होता. याचे आडनाव जाधव होते. नाईक ही उपाधी त्यास देण्यात आली होती". मराठ्यांचा पहिला इतिहास लिहिणारा ग्रँट डफ यांच्या मते, "बहिर्जी नाईक हा रामोशी असावा. याने सुरतची तपशीलवार माहिती शिवाजी महाराजास दिली. सन 1669 च्या नोव्हेंबरात शिवाजी महाराज जालनापूरच्या लढाईत मोगलांच्या कचाट्यात सापडला असता याने त्यास दि. 22 नोव्हेंबर रोजी पटटा (विश्रामगड) किल्ल्यावर सुरक्षित नेले." डफने दिलेल्या या माहितीवरुन बहिर्जी रामोशी असल्यामुळे त्याला शत्रूच्या प्रदेशात गुप्तपणे संचार करुन माहिती मिळविण्याची विलक्षण गती होती. तसेच तो शिवाजी महाराजांचा एक निष्ठावान सेवक होता. त्यामुळे त्याने जोखमीच्या प्रसंगी प्राणांची बाजी लावून शिवाजी महाराजांचे रक्षण केले.

शिवकालीन प्रशासनाची मीमांसा करताना डॉ. प्र.न. देशपांडे लिहितात, "शिवाजी महाराजांनी राज्य स्थापन करुन त्याचा विस्तार किती केला होता हे सभासदांनी आपल्या बखरीत स्पष्ट केले आहे" अंतकाळ जवळ आल्यानंतर शिवाजी महाराजांने मातब्बर आणि मुत्सद्दी लोकांना बोलावले व आपल्या पश्चात राज्यकारभार कसा चालावा याचे मार्गदर्शन केले. यावरुन आपणास शिवकालीन प्रशासन किती चोख आणि मजबूत होते याची प्रचिती येते. सामान्य माणसाचे हित कसे साध्य करावयाचे हा या प्रशासनाचा अंतिम हेतू होता. स्वराज्य हे रयतेच्या कल्याणाची हमी देणारे स्वराज्य होते. त्याची उपयुक्तता ही चोख तसेच जबाबदार अशा प्रशासन यंत्रणेतून सिध्द झाली होती.

**शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची वैशिष्ट्ये -**

शिवाजी महाराजांचे स्वराज्य लोकाभिमुख कल्याणकारी राज्य होते. त्या राज्याने जनतेच्या कल्याणाचा सदैव विचार केला. शिवाजी महाराजांच्या कार्य - कर्तृत्वाचा आढावा घेताना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात, "शिवाजी महाराजांचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणतेचे व परधर्म सहिष्णुतेचे होते. 200-400 लढाया करून त्यात विजय मिळविणे, 300-400 किल्ले मैदानात डोंगरात व समुद्रतीरावर बांधणे, नवीन सैन्य तयार करणे, नवीन आरमार निर्माण करणे, नवे कायदे करणे, स्वभाषेला उत्तेजन देणे, कवींना आश्रय देणे, नवी शहरे वसविणे, स्वधर्माचे संरक्षण करणे या लोकोत्तर कृत्यांनी जर कोणत्या पुरुषाने या भूमंडळाला अक्षण ऋणी करुन ठेविले असेल तर ते शिवाजी महाराज होय." इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे हे मूल्यमापन यथार्थ

आहे. या पलीकडे जाऊन शिवाजी महाराजांचा कल्याणकारी दृष्टिकोन हा महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

जनतेचे कल्याण हा शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचा मुख्य उद्देश असून त्यांनी प्रजेच्या हितावर भर दिला. "अत्यंत धामधुमीच्या काळात शिवाजी महाराजांना शिक्षण, पुनर्रचना व विकास या कामामध्ये लक्ष देता आले नाही; परंतु त्यांनी अशा अस्थिर काळातही लोककल्याणाचा विचार सोडला नाही." यावरून शिवाजी महाराजांनी प्रशासन व्यवस्थेचा विकास केला असे सर यदुनाथ सरकार म्हणतात. धर्म, संस्कृती आणि लष्कर प्रशासन या विविध कार्याचा विचार करतानाही त्यांची सामान्य जनतेच्या कल्याणावर सदैव भर दिला. आपल्या शेतक-यांचे, रयतेचे व प्रजेचे शोषण होता कामा नये, त्यांनी आपल्या राजास दूषण न देता दुआ द्यावा, अशी कामगिरी करण्यास त्यांनी अधिका-यांना प्रवृत्त केले. डॉ. बाळकृष्ण म्हणतात, मंत्र्यांनी भ्रष्टाचार करू नये म्हणून त्यांनी त्यांचे वेतन वाढविले. त्यांना पुरेसा पगार दिल्यामुळे त्यांचे लक्ष अन्यत्र विचलित होणार नाही याची शिवाजी महाराजांना खात्री वाटत होती. त्यांच्या समाज कल्याणकारी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब हे त्यांच्या आर्थिक, लष्करी आणि धार्मिक धोरणातून प्रकट होते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिल्याप्रमाणे, "मूलूख काबीज होतो त्यास मुलखास सरबरा चौकशीस कारकून ठेवावा. आधी लिहिणार चौकस दप्तरदारी करुन, कागद घडणी करुन, मोकासबा दिला म्हणजे दप्तरदारीमध्ये शहाण पाहून मुलुखात ठेवावा आणि महालची मजमू सांगावी. कोणास महालाचा हवाला सांगावा, कोणास सुभ्यास मजमू सांगावी". अशा प्रकारे शिवाजी महाराजांचे प्रशासन योग्य व्यक्तीस योग्य काम या तत्त्वावर आधारलेले होते. कार्यविभागणी व विशेषीकरण या तत्त्वाचा अवलंब त्यांनी केला व शहाणा माणूस पाहून त्याची योग्य पदावर नियुक्ती केली. काळाच्या पुढे जाऊन जनहिताचा विचार करणे हे शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्ये होय. त्यामुळे तत्कालीन काळात झालेल्या सर्व सम्राटांपेक्षा ते अधिक लोकाभिमुख होते.

1. शिवकालीन लोकप्रशासन हे कल्याणकारी राज्य कल्पनेवर आधारलेले होते. त्यांनी रयतेचे हित व कल्याण यावर भर दिला.
2. **'मुद्रा भद्राय राजते'** असे जयराम पिंडे यांनी तयार केलेल्या शिवकालीन राजमुद्रेमध्ये म्हटल्या प्रमाणे, ही मुद्रा जनतेच्या कल्याणासाठी दृष्टी देणारी होती. त्यानुसार राज्यकारभार केला जाऊ लागला. आज्ञापत्र व राजव्यवहार कोशावरुन त्यास दुजोरा मिळतो.
3. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात **'राजा सुखी, तर प्रजा सुखी'** असे सूत्र मांडले आहे. त्यानुसार शिवाजी महाराजांनी प्रजेच्या कल्याणाचा विचार सदैव केला.
4. रयतेच्या भाजीच्या देठासही हात लावू नये, नाही तर मुघल आले त्याहून तुम्ही ऐसा तळतळाट होईल अशी सक्त ताकीद शिवाजी महाराज देतात.
5. शिवकालीन महसूल व सारा हा शेतक-यांची क्षमता व पिकाची उत्पादकता लक्षात घेऊन आकारला जाई.
6. दुष्काळामध्ये सारा कमी केला जाई अथवा माफ केला जाई हे अत्यंत विचारपूर्वक केले जात असे. मंदिरे, मशिदी व गिरिजागृह यांना त्यांच्या धार्मिक कार्यासाठी दिले जाणारे महसूल हे त्यांच्या लोकानुवार्ता भूमिकेस आधारुन दिले जाई.
7. साधू-संत, विद्वान पंडित आणि आचार्य यांचा गौरव केला. संत तुकाराम, बाबा याकूब, मोरया गोसावी इत्यादींच्या भेटीस शिवाजी महाराज स्वतः जात व त्यांचा सन्मान करीत असत. मंदिरे व धार्मिक संस्थांना दिवाबत्ती व उत्सवासाठी विशेष तरतूद केली जात असे.
8. मराठ्यांच्या लाघवी हालचाली मुघलांपेक्षा अधिक सखोल व व्यापक होत्या; पण अशा हालचाली करताना प्रजेचे हित पाहिले जात असे. उभ्या पिकांनी नासाडी करु नका, रयतेच्या भाजीच्या देठासही हात लावू नका, अशा सक्त सूचना शिवाजी महाराजांनी दिल्या होत्या.

यावरून जनतेचे हित व कल्याण साध्य करण्यासाठी शिवाजी महाराज किती तत्पर व कर्तव्यदक्ष होते हे स्पष्ट होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात दंडनीती तसेच अन्य प्राचीन भारतीय संहिता आणि धार्मिक ग्रंथ यामधील प्रशासकीय विचारांची पथदर्शक तत्त्वे त्यांनी आचरणामध्ये आणून आपल्या लोककल्याणकारी प्रशासनास त्यांचे प्रत्यंतर आणून दिले. त्यांच्या लोककल्याणकारी धोरणाची यदुनाथ सरकार, डॉ. बाळकृष्ण, ग. ह. खरे, शेजवलकर इत्यादींनी प्रशंसा केली आहे.

**निष्कर्ष -**

1. शिवकालीन प्रशासन अतिशय मजबूत स्तंभावर उभे होते, त्याची व्यवस्था अतिशय चोख होती.
2. स्वराज्य हे चोख आणि जबाबदार अशा प्रशासन यंत्रणेतून निर्माण झालेले होते.
3. स्वराज्यामध्ये उभ्या असलेल्या प्रशासन यंत्रणेमुळे स्वराज्यामध्ये भयमुक्त वातावरण जीवन जगत होते.
4. शिवाजी महाराजांनी स्थापना केलेले स्वराज्य हे रयतेच्या कल्याणाची हमी देणारे स्वराज्य होते. स्वराज्यामध्ये प्रत्येकाला मग ते लहान मुले असो, स्त्री-पुरुष, व्यापारी, शेतकरी, गरीब-श्रीमंत, सर्वसामान्य जनता अशा सर्व घटकाला स्वतःच्या संरक्षणाची हमी होती.

5. स्वराज्यामध्ये गुन्हेगाराला कठोर शासन केल्याने गुन्हा करताना गुन्हेगार विचार करीत. कुठल्याच गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्यासाठी माफी अथवा शिक्षेमध्ये उच्चपदस्थ म्हणून सवलत नव्हती. गुन्हेगार कोणताही असो एका गुन्ह्यासाठी एकच शिक्षा होती. शिक्षेपासून सुटका नव्हती. याच कारणाने स्वराज्यात अंतर्गत शांतता प्रस्थापित झाली होती.
6. सामान्य माणसाचे हित कसे साध्य करणे हा शिवकालीन स्वराज्यातील प्रशासनाचा अंतिम हेतू होता.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. Grant Duff, history of the Maratha, Edwardes Oxford, 1935.
2. Jean Deloche - The indian Economic & social History Review, 1 January 1978.
3. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1993.
4. चिटणीस, के.एन. - मध्ययुगीन भारतीय संकल्पना व विचार, पुणे, 1937.
5. पवार, जयसिंगराव ; पवार, मंजुश्री, - मराठा सत्तेचा उदय, (इ.स. 1630 ते 1674), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.
6. पाटील, गौतम - शिवकालीन प्रशासन, कैलास पब्लीकेशन्स औरंगाबाद, प्रथमावृत्ती 17 एप्रिल 2014.
7. देशपांडे, डॉ. प्र.न. - छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, जुलै 2007.


***